**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**

नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ६० विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - १९३** **दिनांक — १८/०९/२०२५**

**विभाग — पाणी पुरवठा विभाग**

---

प्रस्तावाचा विषय - मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अहिल्यानगर शहर पाणी पुरवठा योजना ता.जि. अहिल्यानगर. योजना कार्यान्वित करण्यासाठी यु.आय.डी.एफ योजने अंतर्गत अहिल्यानगर महानगरपालिकेस कर्ज स्वरूपात निधी उपलब्ध करून देणेबाबत.

--**--

ठराव — विभागाने प्रस्ताव सादर केल्यानुसार अहिल्यानगर शहरासाठी मा.केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान अंतर्गत पाणी पुरवठा योजनेस रू.१४०.७५ कोटीच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी प्राप्त आहे. तसेच या योजनेस रू.१३७.४८ कोटी सुधारीत मान्यता मिळालेली आहे.

योजनेसाठी मा.केंद्र शासन व मा. राज्यशासनाने निधी उपलब्ध करून दिलेला असून महानगरपालिकेचा रू.३४.३७ कोटी इतका हिस्सा आहे. निविदा अंतीम करते वेळी निविदेमध्ये झालेली वाढ व उर्वरित मनपा हिस्सा विचारात घेता योजना कार्यान्वित करणेसाठी महानगरपालिकेस रू. १४.१२ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.

| अ. क्र. | मंजूर झालेला निधी | योजनेची एकूण किंमत | मा. केंद्रशासन प्राप्त हिस्सा | मा.राज्यशासन प्राप्त हिस्सा ( रक्कम कोटीमध्ये ) | स्थानिक स्वराज संस्थेने उभारलेला हिस्सा | मनपास आवश्यक निधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १३७.४८ | १४४.४८ | ६८.७४ | ३४.३७ | २७.२५ | २७.२५ |

महानगरपालिकेने स्वहिश्यापोटी रू. २७.२५ कोटी इतका निधी उभारलेला असून उर्वरीत रक्कमेची महानगरपालिकेस आवश्यकता आहे. सदर प्रकल्पाच्या स्वः हिस्सापोटी MUIDF/MUIF या योजनेअंतर्गत कर्ज स्वरूपात निधी उपलब्ध करून देणेची तरतूद मा. शासनाने केलेली आहे. तसेच यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था अपात्र झाल्यास UIDF या अंतर्गत देखील कर्ज उपलब्ध होणार आहे. याबाबत नगर विकास विभागाने पत्रामध्ये कळविले आहे. त्यानुसार नगर विकास विभागाकडे सविस्तर प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

विषयांकित योजना भौतिक दृष्ट्या पुर्ण झालेली असून आर्थिकदृष्ट्या पूर्ण करण्यासाठी अहिल्यानगर महानगरपालिकेस या योजने करिता रू.१४.१२ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे. तसेच अहिल्यानगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ प्रलंबीत देयके अदा

करणेकामी रू.७.०० कोटीची आवश्यकता आहे. या करिता मा.महासभेची मान्यता घेणे क्रम प्राप्त आहे.

तसेच आज रोजी झालेल्या बैठकीत १. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) अंतर्गत चाहुराणा बुद्रुक सर्वे नंबर ४६/१ या जागेमध्ये गोरगरीब रूगणांसाठी अद्यावत सुसज्ज नविन हॉस्पिटल बांधणे. ( स्थापत्य कमासह विद्युत, प्लंबिग व उदवाहनसह) व २. अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील नगररचना योजना क्र.४, अंतिम भुखंड क्र.१२९ (पैकी) सावेडी, प्रोफेसर कॉलनी चौक येथे बंदिस्त नाटयगृह बांधणे.(ध्वनीशास्त्र. विद्युत, अग्नीशामक, स्थळ विकास ) या दोन प्रकल्पाचा रक्कम रू.२०.००. कोटी मनपा हिश्याचा कर्ज प्रस्तावास मा.महासभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

तसेच नेहरू मार्केट चितळे रोड सि.स.नं.२०८ या आरक्षण क्र.२१६ येथे भाजी मार्कट व व्यापारी संकुल विकसीत करणे.प्रकल्पांची रक्कम रू. ८,९०,०८,१८५/-
व अहिल्यानगर मनपाच्या मालकीच्या सर्जेपुरा सिटी सर्व्हे नं.६४६६, ७५४७, ७१८९ या ठिकाणी नाटयगृह व व्यावसायिक जागा/शॉपिंग कॉम्प्लेक्स विकसित करणे रक्कम रू. २६,७६,७७,९३६/- ऐकुण दोन्ही प्रकल्पासाठी रक्कम रू.३५.६६ कोटी इतकी रक्कम कर्ज स्वरूपात उपलब्ध करून घेणे कामी मा. महासभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे.

करिता अहिल्यागनर महानगरपालिकेस विषयांकित पाणी पुरवठा योजनेसाठी प्रकल्पाच्या स्वः हिस्सापोटी रू.२१.१२ कोटी इतका निधी तसेच बांधकाम विभागच्या प्रकल्पासाठी रक्कम रू. २०.००. कोटी व प्रकल्प विभागाच्या प्रस्तावीत कामासाठी रक्कम रू.३५.६६ कोटी अशी एकुण रक्कम रू.७६.७८.कोटी इतका निधी MUIDF.अथवा MUIF अथवा यु.आय.डी.एफ. या योजनेअंतर्गत कर्ज स्वरूपात निधी उपलब्ध होणेसाठी या बाबतचा सविस्तर प्रस्ताव तयार करून नगरविकास विभाग-२. मंत्रालाय, मुंबई यांचेकडेस सादर करणेस मा. प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| ( सही ) | ( सही ) |
| ( मेहेर लहारे ) | ( यशवंत डांगे ) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |